**प्रेसनोट दिनांक २६/०६/२०१९.**
**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे शहर.**
**<u>खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्हयातील अल्पवयीन मुले पोलीसांच्या ताब्यांत.</u>**

दिनांक २३/०६/२०१९ रोजी रात्रौ २०/०० वाजताचे सुमारांस श्री.सुनिल नामदेव कोंढाळकर,वय-४५ रा.नवी पेठ,पुणे यांचेशी झालेल्या किरकोळ भांडणाचा राग मनात धरुन तीन विधी संघर्षित बालक यांनी श्री.सुनिल कोंढाळकर यांचे दोन्ही हातांवर, कानावर, व डोक्यांत कोयत्याने वार करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन त्यांचे पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरुन विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर येथे गुन्हा नोंद क्रमांक-२४२/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३०७,३२३,५०६,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यांत आलेला होता.

माननीय पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, व सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग,पुणेशहर यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास चालु असतांना सदर गुन्हयातील वरनमुद अल्पवयीन विधी संघर्षित बालक हे वैकुंठ स्मशानभुमी परिसरांत येणार असलेबाबत विश्रामबाग पोलीस ठाण्याचे तपास पथकातील पोलीस नाईक बाबा दांगडे व पोलीस शिपाई संजय बनसोडे यांना मिळालेल्या गुप्त बातमीवरुन पोलीस निरीक्षक श्री. दादासाहेब चुडाप्पा यांचे अधिपत्याखाली तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री. विजय जाधव, पोलीस नाईक बाबा दांगडे, धिरज पवार, पोलीस शिपाई संजय बनसोडे, प्रशांत शिंदे, चेतन शिरोळकर व राहुल पवार यांनी दिनांक-२५/०६/२०१९ रोजी रोजी वैकुंठ स्मशानभुमी परिसरांत सापळा रचुन नमुद गुन्हयांतील तिनही विधी संघर्षित बालक यांना ताब्यांत घेवुन त्यांनी गुन्हयात वापरलेले तिन्ही कोयते हस्तगत करुन वरनमुद गुन्हा उघडकींस आणुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

( दादासाहेब चुडाप्पा )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर
( अतिरिक्त कार्यभार )